आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.२२

# “केंद्रीय निवासी माध्यमिक अनुसूचित जातीच्या आश्रमशाळेत सात मापदंडाच्या सहाय्याने शाळा संस्कृती विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका”

# The Role of School Leadership in School Culture Development With the help of Seven Parameters in Central Scheduled Caste Residential School

**प्रस्तावना -**

अब्दुल कलाम सरांच्या मते, “शिक्षणातून नवनिर्मिती होते, नवनिर्मितीतून विचार घडतात, विचारातून ज्ञानाची कवाडे उघडतात, ज्ञानातून अध्ययनार्थी परिपूर्ण होतात.” एकीकडे शिक्षणाचे महत्व सांगणारे कलामांचे उदगार तर दुसरीकडे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार- 2009 ज्यामुळे प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळविण्याचा हक्क मिळाला.या पार्श्वभूमीवर  मागास वर्गातील अनुसूचित जातीमधील सर्व मुले-मुली शिक्षणाच्या प्रवाहात दाखल झालेली दिसून येत नाही.मुख्यतः भारतीय संविधानाच्या 341 व 342 या अनुच्छेदनुसार मागासलेले वर्ग राष्ट्रपती जाहीर करतात, त्यात अनुसूचित जाती, जमातीची संख्या आणि  समस्यांच्या व्यापकतेमुळे अधिक  महत्त्वाच्या गणल्या जातात.महाराष्ट्र राज्याने यासोबत विमुक्त जाती , भटक्या जमाती, नवदीक्षित बौद्ध व आर्थिकदृष्ट्या मागासलेले यांचा समावेश केलेला आहे.सामान्यतः अनुसूचित जातीला अस्पृश्य मानून समाजात नीचतम स्थान होते. त्यांच्या मागासलेपणाचे मूळ कारण शैक्षणिक,व्यावसायिक,सामाजिक इ. सर्वांगीण निर्बंधामध्ये दडलेले दिसून येते.अनुसूचित जातीच्या उन्नतीसाठी शासनाबरोबरच विशेषतः महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले,विठ्ठल रामजी शिंदे,सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

भारताचे संविधान तयार करतांना अनुसूचित जातींसाठी संरक्षण व अस्पृश्यता निर्मुलनासाठी संविधानात्मक तरतुदी करण्यात आल्या होत्या. भारतीय संविधानाच्या कलम 15 (4), 45 आणि 46 मध्ये अनुसूचित जाती आणि जनजातींच्या मुलांसाठी शिक्षणाची उपलब्धी राज्यांची क्षमता आहे असे म्हटले आहे.

2001 च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीमध्ये महार (57.5%),मांग (20.3%), चांभार (12.5%), भंगी (1.9%)या प्रमुख चार समाजाची लोकसंख्या 92 टक्के इतकी आहे.पुरोगामी महाराष्ट्रात अनुसूचित जातीतील 59 प्रकारच्या जातीसाठी एकूण आरक्षण 13 टक्के असले तरी शिक्षणाचे चित्र फारसे समाधानकारक नाही.समाजात आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक दृष्ट्या वंचित घटकाला शिक्षण प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी शालेय नेतृत्त्वात शिक्षक,मुख्याध्यापक,संस्थाचालक (अशासकीय सेवाभावी संस्था) मेहनत घेत आहेत. अनुसूचित जातीतील मुलांना शिक्षणाची संधी देऊन घडविण्यासाठी कार्य करणाऱ्या शालेय नेतृत्वाचा अभ्यास प्रस्तुत मोड्युलच्या सहायाने आपण करणार आहोत.

**मोड्युल अध्ययनाची उद्दिष्टे:-**

१) अनुसूचित जातीतील मुला-मुलींची कौटुंबिक, सामाजिक,शैक्षणिक व आर्थिक स्थिती समजून घेणे

२) शाळेतील शाळा संस्कृती संकल्पना समजून घेणे.

३) अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा संस्कृती निर्माण करीत यश प्राप्त करणाऱ्या नेतृत्वाचा अभ्यास करणे.

४) अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा संस्कृती निर्माण करणाऱ्या नेतृत्वाविषयी दृष्टिकोन निर्माण करणे.

**अनुसूचित जातीचा शैक्षणिक विकास:-**

वास्तविकपणे भारतात सामाजिक आणि आर्थिक उत्थानासाठी शैक्षणिक उपेक्षा केली जाऊ शकत नाही असे म्हटले गेले आहे.परंतु भारतीय समाजाच्या संरचनेत अनुसूचित जातीतील व्यक्तींना नेहमी अशिक्षित , निर्धनता,अंधविश्वास आणि अज्ञान या कारणांमुळे शोषण,दमनाचे शिकार व्हावे लागत होते.

तथापि भारताच्या एकूण जनसंख्येच्या जवळपास 25% संख्या अनुसूचित जातीची आहे. अनुसूचित जातीच्या विकासासाठी अनुच्छेद 46,15(4), 29/2 आणि 350 (क) मध्ये विशेष तरतूद करून त्यांना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश तथा औपचारिक शिक्षण घेण्याचा अधिकार मिळालेला आहे.तथापि भारताच्या पहिल्या,दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शिक्षणासाठी विविध योजना सुरू करण्यात आल्या होत्या.

भारतात 1961ला साक्षरतेचे प्रमाण 10.27% तर 1991 ला 37.41% इतके वाढलेले दिसते. 1995-96 मध्ये अनुसूचित जातीच्या मुलामुलींचे 67.60% प्रवेश माध्यमिक शाळेत झाले ही बाब समाधान वाटणारी असली तरी 100% ही मुले-मुली शिक्षणाचा आधार घेऊन विकासाची कवाडे उघडताना दिसत नाही. या मोडूलमध्ये धुळे जिल्ह्यातील

केंद्रशासनाच्या अनुसूचित जातीच्या निवासी आश्रम शाळेतील शाळा संस्कृती निर्माण करून या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडवून आणणाऱ्या नेतृत्वाचा अभ्यास करणार आहोत.

**शाळा संस्कृती संकल्पना-**

शिक्षणाच्या प्रवाहात प्रत्येक बालक टिकवून गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्यासाठी शाळा-शाळांतून संस्कृती निर्माण होणे गरजेचे आहे.शाळा संस्कृतीमध्ये सर्वांमध्ये परस्पर संबंधाचे वातावरण असते. शिक्षणासह शिक्षणाचे देखील मुल्यमापन केले जाते. तथापि मिळालेले यश समूहात साजरे करून सहकार्य सर्वसामान्य प्रमाण मानले जाते.यासाठी शाळेच्या नेत्यांनी स्वस्थ शाळा संस्कृती निर्माण करण्यासाठी आग्रही राहिले पाहिजे. स्वस्थ शाळा संस्कृतीमध्ये नेतृत्व वैयक्तिक बलिदाने देऊन लोकांना काम करण्यास भाग पाडतात.

तसे पाहिले तर शाळा संस्कृती एक मानसिकता असल्याने ही सकारात्मक आणि नकारात्मक असू शकते.
जेव्हा शालेय संस्कृती मध्ये सकारात्मकता कायम असते तेव्हा प्रत्येक जण शिकतो. प्रत्येक घटक (प्रशासन प्रमुख,शिक्षक,विद्यार्थी,संस्था प्रमुख आनंद अनुभवतात . विद्यार्थी शिक्षण वर्धित होतो. शिक्षकांची वृद्धी होऊन ते सुधारतात. यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतात हे विसरून चालत नाही.

**अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांबाबत नेतृत्वासमोर असलेली आव्हाने-**

शासनाने वंचित घटकांच्या विकासासाठी आरक्षण,शिष्यवृत्ती,सवलती,प्रोत्साहन भत्ते दिले असले तरी कमालीचे दारिद्र्य,अशिक्षितपणा,अंधश्रद्धा मागासलेपणा,अस्वच्छ कामे या विळख्यात आजही समाज अडकलेला दिसतो

**विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने:-**

1) शाळेत येण्याची व शिकण्याची ओढ नसणे.
2) निवासी शाळा असल्याने घरी जाण्याचे प्रमाण बऱ्याच अंशी असणे.
3) गावात मिळणारा रोजगार आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह याकडे लक्ष असणे.
4) अल्पवयात आर्थिक प्राप्तीमुळे व्यसनाचे प्रमाण असणे.
5) विद्यार्थी शारीरिक अस्वच्छता,आपली दिनचर्या,स्व अभ्यास याकडे दुर्लक्ष करतात परिणामी आरोग्य,गुणवत्तेचे प्रश्न निर्माण होणे.
6) सहशिक्षणामुळे भिन्नलिंगी आकर्षणातून प्रश्न निर्माण होणे.

**शिक्षकांशी संबंधित आव्हाने:-**

1) विद्यार्थ्यांचा शाळा,शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन सकारात्मक करणे.
2) निवासी विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारणे.

3) शाळा संस्कृती रुजवून विद्यार्थ्यांच्या क्षमता, कौशल्यांचा विकास करणे.

4) शिक्षण,नोकरी,रोजगार यातील सहसंबंध विद्यार्थ्यांना समजावून सांगणे.

5) अध्ययन-अध्यापन प्रक्रिया नाविन्यपूर्ण,विशेष, आनंददायी करून विद्यार्थ्यांना टिकवून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे.

**पालकांशी संबंधित आव्हाने:-**

1) आपल्या पाल्याचा शिक्षणातून विकास होऊ शकतो हा विश्वास निर्माण करणे.

2) विद्यार्थी प्रगती विषयी समज निर्माण करणे.

3) दारिद्र्य,अशिक्षितपणा,अज्ञान,मागासलेपणा यामुळे मुलांना योग्य मार्गदर्शनाचा अभाव पालकांमध्ये असणे.

4) पालक छोटे सण,उत्सव,नवस,लग्न,धार्मिक कार्यासाठी पाल्यांना घरी घेऊन जातात त्याचे प्रमाण कमी करणे.

5) आपल्या पाल्याच्या शैक्षणिक गरजांची पूर्तता प्राधान्यक्रम आहे याबाबत जाणीव जागृती निर्माण करणे.

**संस्थाचालकांशी संबंधित आव्हाने:-**

1) शाळेशी संबंधित प्रत्येक घटकांमध्ये शिक्षणाबाबत सकारात्मक भावना निर्माण करणे.

2) अभ्यासक्रम पुर्ततेसह विद्यार्थी,शिक्षकांना विकासाच्या संधी प्राप्त करून देणे.

3) शासनस्तरावरून मिळणारे 90 टक्के अनुदान वेळेवर प्राप्त न झाल्यास अनुदान उपलब्ध करुन गरज भागविणे.

4) अप्रगत विद्यार्थी प्रवेशित करून स्वयंरोजगार निर्मिती पर्यंतचा प्रवास गाठण्याच्या प्रक्रियेला सतत उत्तेजन देणे.

5) शाळा संस्कृती विकसनासाठी जीवनकौशल्ये, गाभाघटक,मूल्यांची रुजवणूक करीत सर्व घटक कल्पक, सृजन राहतील यासाठी नवोपक्रम राबविणे.

**शाळा - केंद्रीय निवासी माध्यमिक शाळा, वार, ता.जि.धुळे**

**संस्थाचालक, मुख्याध्यापक शाळा संस्कृती यशोगाथा:-**

संस्थाचालक - श्री महेंद्र विसपुते- आदर्श शिक्षण मंडळ, धुळे

मुख्याध्यापक - श्री किशोर देसले -प्राथमिक विभाग

मुख्याध्यापक- श्री शेखर भावसार- माध्यमिक विभाग



म्हसदी गावातील सरपंच 'ऋषीमहाराज' म्हणजे श्री. देविदास विसपुते हे  संस्थाचालक श्री. महेंद्र विसपुते यांचे वडील होते.त्यांना  9 डिसेंबर 2001 ला केंद्र शासनामार्फत  उत्तम महिला वसतिगृह प्रमुख म्हणून पुरस्कार मिळाला. वंचितापर्यंत शिक्षण पोहोचवायचे  या ध्येयाने त्यांनी  अशासकीय सेवाभावी शिक्षण संस्था स्थापन करून धुरा पुत्र श्री.महेंद्र विसपुते यांच्याकडे दिली.केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय,भारत सरकार नवी दिल्ली यांनी अनुसूचित जातीतील मुला-मुलींसाठी निवासी आश्रम शाळा बाबत प्रस्ताव सन 2002 साली मागविले. महाराष्ट्रात 35 तर भारतात 450 शाळा स्थापन झाल्या. शाळा चालविण्याचा पहिला नियम केंद्र शासनाचे 90% अनुदान स्वयंसेवी संस्थाचे 10% अनुदान तर शाळेत 60% विद्यार्थी अनुसूचित जातीचे तर 40% विद्यार्थी इतर परंतु आर्थिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असलेल्या घटकातील असावे. महाराष्ट्रातील 35 शाळांना
शासनाने माध्यम,पाठ्यपुस्तके,मूल्यमापन यासाठी 6 फेब्रुवारी 2006 ला संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी परवानगी दिली.

आपल्या वडिलांचा वारसा घेऊन श्री महेंद्र विसपुते यांनी शाळा संस्कृती विकसनासाठी सात मापदंड ठरविले. त्यासाठी मुख्याध्यापक श्री. किशोर देसले (प्राथमिक विभाग) श्री. शेखर भावसार (माध्यमिक विभाग) यांच्याशी शाळा विश्लेषण याबाबत चर्चा केली. सुरुवातीला दोन्ही मुख्याध्यापक नकारात्मक होते. त्यांच्यामध्ये संस्थाचालक म्हणून कोणीतरी सांगितलेले करायला लावतात अशा मानसिकतेत होते .परंतु शाळा विश्लेषण त्यांच्यासमवेत करताना मुख्याध्यापक समजून घेऊन सकारात्मक झाले. त्यांनी शिक्षकांना व इतर कर्मचाऱ्यांना विश्वासात घेण्याची जबाबदारी सहज /लीलया पेलली. सकारात्मक शाळा संस्कृती विकासासाठी संस्था चालकासह मुख्याध्यापक, शिक्षक,इतर कर्मचारी, विद्यार्थी यांचा एक गट होऊन सात मापदंड राबवण्यास सुरुवात झाली.त्याआधारे शाळेत सकारात्मक संस्कृती रुजवित तळागाळातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व  रोजगार निर्मितीस पोषक शिक्षण देण्याचे ठरविले.

**सात मापदंडाचा तपशील:-**

१) Our vision, our mission  (आमची दृष्टी, आमची चळवळ):-

या मापदंडासाठी शाळेच्या गरजा लक्षात येण्यासाठी SWOT विश्लेषण करून  मास्टर प्लॅन तयार करण्यात आला. स्वामी विवेकानंद आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा आधार घेऊन विद्यार्थी जीवनात यशस्वी होतील यासाठी लोकशाही रुजवणूक करण्यासाठी बाल संसद स्थापन करण्यात आली.पंतप्रधानासह  गृह, शिक्षण, क्रीडा, कृषी, सांस्कृतिक, शालेय पोषण आहार, आरोग्य व स्वच्छता या सर्व खात्यांच्या मंत्री लोकशाही पद्धतीने निवडून आले. मंत्र्यांना शपथविधी दिला जातो. ही संसद शाळेच्या प्रशासन सांभाळण्यास मदत करते. विवेकानंदांचे विचार अंगीकारत शाळेत ध्यानधारणेवर भर दिला जातो.

२) Experts/Guest lecture and Guidance (तज्ञांचे व अनुभव संपन्न व्यक्तींचे मार्गदर्शन ) :-

शाळेत प्रत्येक महिन्याला धुळे जिल्ह्यातील व्यावसायिक तज्ञांचे तथा अनुभव संपन्न निमंत्रितांचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन,रोजगाराच्या विविध संधीसाठी व्याख्यान आणि मार्गदर्शन,उद्योजकता, करिअर संधी, शिक्षणाच्या पुढील संधी या विषयावर प्राचार्य,तज्ञ , उद्योजक, संस्थाचालक यांच्याशी विद्यार्थी संवाद घडवित हितगूज केले जाते. परिणामी विचार करण्याच्या कक्षा रुंदावण्यावर भर दिला जातो.

३) Quality Education (गुणवत्तापूर्ण शिक्षण) :-

शाळेने परंपरागत शिक्षणाला फाटा देत समज निर्माणावर, विचार करण्याच्या प्रक्रियेवर, कृतीयुक्त अनुभव देण्यावर भर दिला आहे. त्यासाठी बोलक्या भिंती, डिजिटल वर्ग, ज्ञानरचनावादी वर्गांतरक्रिया, क्षेत्रभेटी, कृषी प्रदर्शन भेटी, विज्ञान व चित्रकला प्रदर्शन यातून अनुभवविश्व समृद्ध केले जाते. निवासी शाळेतील विद्यार्थी सामान्य शाळेतील विद्यार्थ्यांपेक्षा शिक्षकांच्या जास्त काळ जवळ राहतो. अध्ययन साहित्याच्या उपयोगातून स्वतः मत,विचार व्यक्त करून ज्ञान निर्मिती करण्याचा प्रयत्न करतात.



४ ) Sports Activity ( खेळ \ कृती ) :-

शाळेच्या प्रत्येक शनिवारी शाळा खेळासाठी बॅगलेस असते.या दिवशी विद्यार्थी खेळाची मैदाने स्वच्छ करतात. प्रशिक्षकासमवेत शिक्षकांसह विद्यार्थी जिम, रनिंग, झीप लाईन, ज्यूडो कराटे, कुस्ती, व्हालीबॉल, योगा, बॅटमिंटन, बुद्धिबळ, रोपे वे, मल्लाखांब खेळात सहभागी होतात. विविध खेळांचा आनंद घेऊन खेळ शिकतात . विविध स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत विद्यार्थी यशस्वी झालेली आहेत.

### ५) Practical Education and other activities (अनुभव आधारित शिक्षण आणि इतर कृती):-

शाळेने व्यावसायिक शिक्षण व रोजगार निर्मिती हेतूने मुलांना एक एकर शेती उपलब्ध करून दिली आहे. जिथे 100% सेंद्रिय पद्धतीने फळबागांची शेती मुले-मुली करतात. त्यासाठी विद्यार्थ्यांना माती परीक्षण, पूर्वमशागत, लागवड, अंतर मशागत, खते (कंपोस्ट),जीवामृत, निंबोळी अर्काची फवारणी, कापणी,बियाणे खरेदी, भाजीपाला फळे विक्री प्रक्रिया याबाबत प्रशिक्षण व सहभागाची संधी दिली जाते. विद्यार्थ्यांना दिवाळीसाठी दिवे तयार करायला शिकविले. हे दिवे त्यांनी परदेशात (लंडन, कॅनडा,ऑस्ट्रेलिया) विकले. परदेशी निर्यात समजून घेतली. जीर्ण झालेल्या झाडापासून ब्रह्मोस्त्र यान शाळेच्या प्रांगणात उभे केले.

### ६) Outdoor visit (क्षेत्र भेट) :-

शाळेकडून ऐतिहासिक स्थळांना, वस्तुसंग्रहालय, औद्योगिक वसाहती, पर्यावरण पूरक क्षेत्र अशा विविध ठिकाणी भेटी दिल्या जातात. यावेळी संवाद,प्रश्न-उत्तरांची संधी विद्यार्थ्यांना दिली जाते. व्यावसायिक दृष्टिकोन,भविष्यातील संधीची स्पष्टता यामागील हेतू आहे.

### ७) Guardianship (पालकत्व):-



शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांशी कायमचे ऋणानुबंध राहावे यासाठी अनोखा उपक्रम शाळेने हाती घेतला आहे. संस्थाचालकांसह प्रत्येकाला दहा विद्यार्थ्यांचे पालकत्व दिले जाते. निराधार मुलांचे पालकत्व घेण्याबाबत विशेष काळजी घेतली जाते.विद्यार्थांच्या कायम फोन अथवा भेटून इयत्ता दहावी नंतर प्रवेशाबाबत मार्गदर्शन, करिअरच्या वाटा, भविष्यात मुले काय करीत आहेत याचा आढावा घेतला जातो. परिणामी शाळेशी मुला-मुलींची नाळ जुळलेली राहते.शाळेत सात मापदंडाच्या सहाय्याने शाळा संस्कृती निर्माण झाली त्याचा फायदा शिक्षकांसह मुला-मुलींना आणि प्रत्येक घटकाला झाला.

1) लोकशाही ही जीवनपद्धती आहे हे कृतीतून समजले.
2) शालेय प्रशासनाची जबाबदारी समजली.
3) मुलां-मुलींच्या आवड,क्षमतेनुसार कार्य करण्याची संधी मिळाली.
4) अनुभवाधारित शिक्षणाने आत्मविश्वास वाढीस लागला.
5) अप्रगत विद्यार्थ्यांना अध्ययन गोडी लागून गैरहजेरीचे प्रमाण कमी झाले.
6) विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास झाला.
7) आंतरराष्ट्रीय स्तरावर मार्केटिंग करण्याचे कौशल्य विकसित झाले.
8) व्यवसाय शिक्षणाची गोडी लागून व्यवसाय सुरू करण्याची क्षमता निर्माण झाली.

9) भविष्यातील संधी बाबत स्पष्टता व दृष्टिकोन निर्माण झाला.

विद्यार्थी विविध पदावर कार्यरत आहेत.

1) संतोष केदार- व्यावसायिक
2) स्वाती नागमणी-पोलीस दल
3) शंकर गडदरे- हॉटेल
4) संदीप देवरे- मेडिकल शिक्षण
5) अनेक विद्यार्थी इंजिनिअरिंगच्या विविध शाखेत आहेत

सध्या शाळेत प्लास्टिक निर्मूलन मोहीम अंतर्गत प्लास्टिक पाणी बॉटल पासून शाळेची ध्यानधारणा खोली तयार करण्याचे कार्य सुरू आहे. तांत्रिक सक्षमतेसाठी ड्रोन,रोबोट शिकविण्याची तयारी चालू आहे.शाळेने खऱ्या अर्थाने कौटुंबिक वातावरण देऊन विद्यार्थ्यांना घडविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. शाळा संस्कृती निर्माण करून शिक्षण प्रक्रिया पूर्ण करणारा शालेय नेतृत्वाचा प्रवास प्रेरणादायी,मार्गदर्शक व थक्क करणारा आहे.

केंद्रीय निवासी माध्यमिक शाळा, वार, ता.जि.धुळे

https://youtu.be/fsRiZlpUMQE

**चिंतनात्मक प्रश्न:-**

1) केंद्रीय निवासी अनुसूचित जाती आश्रम शाळेच्या नेतृत्वाला सकारात्मक शाळा संस्कृती निर्माण करण्यास कोणत्या बाबी सहायभूत ठरल्या होत्या याबाबत आपले मत लिहा.
2) सकारात्मक शाळा संस्कृती निर्माण करण्यासाठी प्रस्तुत नेतृत्वाला अजून कोणत्या बाबी करता आल्या असत्या त्या बाबी सुचवा.

**विचार करूया :-**

1) तुम्ही एका निवासी आश्रम वा निवासी शाळेचे मुख्याध्यापक आहात. तुमच्या शाळेत पायाभूत क्षमता प्राप्त नसलेले विद्यार्थी प्रवेशित झालेले आहेत त्यांना या क्षमता प्राप्त होण्यासाठी नेमके कोणते प्रयत्न कराल?
2) आपल्या निवासी वा अनिवासी आश्रमशाळेत सहशिक्षणाची सोय आहे. मुला-मुलींमध्ये आकर्षण वाटल्या विषयीची प्रकरणे वाढत आहेत. अशा विद्यार्थ्यांना समजावून सांगून शिक्षणाच्या प्रवाहात टिकविण्यासाठी कोणत्या विशेष उपाययोजना कराल?

**अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशिष्ट मापदंडाच्या साह्याने शाळा संस्कृती निर्माण व्हावी यासाठी असेही करता येईल:-**

1) पालक व विद्यार्थी यांच्यासाठी शैक्षणिक समुपदेशन कक्ष उभारणे.

2) माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने यशस्वी विद्यार्थी अनुभव कथन पुस्तिका, मेळावे, शाळेचे महत्त्व पटवून देणारे उपक्रम घ्यावेत.

3) विद्यार्थ्यांच्या समवेत विश्वासू नातेसंबंध दृढ करून उपक्रमात उपस्थिती, सहभाग,रुची,छंद याबाबत अनौपचारिक संवाद करणे.

4) शाळा संस्कृती निर्माण करण्यासाठी प्रशासक, शिक्षक-पालक,विद्यार्थी यांची एक साखळी निर्माण करणे.

5) शिक्षकांच्या मनोधैर्याची इमारत आणि त्यांची देखभाल सकारात्मक शाळा संस्कृती वाढविण्यासाठी करणे.

6) शाळा संस्कृतीला हानी पोहचविणाऱ्या अडचणींची प्राथमिक सूची करणे व त्यावर तात्काळ उपाय आखणे.

**अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजना:-**

1) मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
2) राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता व देशांतर्गत शिष्यवृत्ती
3) मागासवर्गीय विद्यार्थी- शिक्षण व परीक्षा फी प्रदाने, माध्यमिक गुणवत्ता शिष्यवृत्ती
4) अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती
5) अनुसूचित जाती विद्यार्थी- भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती (इ. नववी व दहावी)
6) अपंग विद्यार्थी- शालांत पूर्व, मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यात शिक्षकांविषयी अपेक्षा व्यक्त करताना असे नमूद केले आहे की, सेवेचे वातावरण आणि संस्कृती बाबत परिणामकारक कार्य करण्यासाठी शिक्षकांची क्षमता वाढविणे गरजेचे आहे.शिक्षकांचे सामाईक उद्दिष्ट 'आपले विद्यार्थी शिकत आहेत याची खात्री करणे' असे म्हटले आहे.

धोरण असे नमूद करते की, शाळेसाठी सशक्त व कनवाळु शिक्षक,विद्यार्थी,पालक,प्राचार्य आणि इतर सहकारी वर्ग यांचा समावेश एका समूहात असावा.समावेशित आणि समन्यायी समाजाबद्दल राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अधोरेखित करते की, सामाजिक न्याय व समता मिळविण्यासाठी शिक्षण हे एकमेव सर्वात मोठे साधन आहे. प्रत्येक नागरिकाला स्वप्न पाहण्याची,भरभराट करण्याची आणि राष्ट्रासाठी योगदान देण्याची संधी मिळाली पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने अशी पुष्टी केली आहे की, मुलांची पोहोच,सहभाग आणि शालेय शिक्षणातील
निष्पत्ती यामधील सामाजिक संवर्गातील दरी भरून काढणे हे शैक्षणिक क्षेत्रातील कार्यक्रमाच्या मुख्य उद्दिष्टापैकी निरंतरपणे एक उद्दिष्ट राहिले पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असा उल्लेख करण्यात आला आहे की, भारतीय शिक्षण व्यवस्था आणि नियमित शासन धोरणे यांनी शालेय शिक्षणात सर्व स्तरांमध्ये लिंग आणि सामाजिक संवर्ग यातील दरी भरून काढण्यासाठी प्रगती केलेली दिसून येत असली तरी असमानता बाकी आहे. त्यासाठी सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या वंचित

घटक, सामाजिक सांस्कृतिक ओळख प्राप्त असलेल्या वर्गीकरणात अनुसूचित जातीसह जमाती,इतर मागास वर्ग आणि अल्पसंख्यांकाचा समावेश केला जावा.

**प्रस्तुत मोड्युलची शालेय नेतृत्वासह शिक्षकांच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता:-**

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 सर्व मुलांना समान व गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करण्याची संधी तथा त्यासाठी सक्षम यंत्रणा तयार करण्यावर भर देते. यासाठी शाळेत सकारात्मक शाळा संस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे. प्रत्येक शाळेत अनुसूचित जातीचे मुले-मुली दाखल होतात त्यांना उपलब्ध सुविधा सर्व शिक्षकांना ज्ञात असणे गरजेचे आहे.

1) अनुसूचित जातीचे विद्यार्थी शिक्षण प्रवाहात येतील त्यांचे स्थलांतराचे प्रमाण अत्यल्प होईल.
2) समता,बंधुता,न्याय शाळेच्या माध्यमातून समाजात  दृष्टिक्षेपास येईल.
3) सकारात्मक शाळा संस्कृती निर्माण झाल्यास उद्योगभिमुख  समाजाची भविष्यात निर्मिती होईल.
4) शाळेतील माजी-आजी विद्यार्थी शिक्षणाचा राजमार्ग यशाकडे जातो हे पटवून देतील.
5) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घेत शिक्षक,मुख्याध्यापक योग्य माहितीच्या आधारे प्रश्नांची उकल करण्यात यशस्वी होतील.

**समारोप-**

शासनाच्या विविध योजना आणि समाजात होणारे वैचारिक बदल अशा आशादायी पार्श्वभूमीवर अनुसूचित जातीच्या मुलामुलींचे प्रवेश,उपस्थिती टिकवून, संपादणूक हे प्रश्न जिकरीचे आहेत.

निवासी आश्रम शाळेने सात मापदंडाचा आधार घेत शाळा संस्कृती निर्माण करीत, स्व विकास साधत उद्योगमुख शिक्षणाची कास धरलेली आहे. श्री. महेंद्र विसपुते सर,श्री.किशोर देसले सर श्री शेखर भावसार सरांसहित या शाळेतील प्रत्येक शिक्षक,कर्मचारी एक नेतृत्व आहे.

या नेतृत्वाने केलेले प्रयत्न आपल्या शाळेत करून समाजातील प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण नेता येईल असा विश्वास  दुणावतो.

**संदर्भ सूची -**


1) शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद
2) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 2020 मसुदा
3) शिक्षकांसाठी शाळा प्रशासन-डेरी मेडोडोर
4) शाळा संस्कृतीच्या गोष्टी आणि धोरणे-डेरिक मेडोडोर

Websites-


1) http://mr.vikaspedia.in/health
2) https://mr.m.wikipedia.org/wik/
3) https://mr.eferrit.com
4) https://www.magicbrick.com/blog
5) https://shaalasiddhi.niepa.ac.in
6) https://marathivishwokosh.org
7) New Education Policy 2020 - सम सामायिक घटनाक्रम विशेष



**मोड्यूल विकसक**
डॉ.मंजुषा क्षीरसागर
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
धुळे

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्री.रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद